सत्यमेव जयते

# राज्यपालांचे सचिवालय

# महाराष्ट्र राज्य

**राजभवन, मलबार हिल, मुंबई 400035.**

**( ३१ डिसेंबर २०१७ अखेर )**

# नागरिकांची सनद

**( १ जानेवारी २०१८ )**

Website:- http://rajbhavan.maharashtra.gov.in

Email :- governor-mh@nic.in

ईपीएबीएक्स दूरध्वनी क्र. 022-2363 23 43 / 2369 47 99 /
2363 24 26 / 2363 43 88

फॅक्स क्र. 022-2363 32 72

# राज्यपालांचे सचिवालय

# कार्यालयाची संरचना




मंजूर आकृतीबंधः- एकूण 80 अधिकारी / कर्मचारी

कार्यालयीन कामाची वेळः- सकाळी 09.45 ते सायंकाळी 5.45

# <u>नागरिकांची सनद</u>

**<u>प्रस्तावनाः</u>**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 153 व 154 मधील तरतुदींनुसार, राज्यपाल हे राज्याचे कार्यकारी प्रमुख असतात. राज्याच्या कार्यकारी अधिकाराचा वापर संविधानानुसार राज्यपालांकडून किंवा त्यांच्या हाताखालील अधिका-यांमार्फत करण्यात येतो. राज्यपाल मंत्री परिषदेच्या मदतीने व सल्ल्याने, संविधानातील तरतुदीनुसार अधिकारांचा वापर करतात. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) नुसार, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र विभागासाठी विकास मंडळे स्थापन करुन राज्याच्या गरजा विचारात घेऊन या तीन विभागांमध्ये विकासात्मक खर्चाचे समसमान वाटप करण्याची विशेष जबाबदारी राज्यघटनेने राज्यपालांवर सोपविलेली आहे. विद्यापीठ अधिनिमान्वये, राज्यपाल हे महाराष्ट्रातील विद्यापीठांचे कुलपती आहेत. सध्या महाराष्ट्र राज्यात 20 विद्यापीठे असून त्यात 11 परांपरागत विद्यापीठे व 4 कृषि विद्यापीठ, 1 तंत्रज्ञान विद्यापीठ, 1 संस्कृत विद्यापीठ, 1 मुक्त विदयापीठ, 1 आरोग्य विज्ञान विद्यापीठ व 1 पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठांचा समावेश आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 244 मधील पाचव्या अनुसूचीनुसार राज्याच्या आदिवासी क्षेत्र विकाससंदर्भात विशेष स्वरुपाची संविधानीक जबाबदारी राज्यपालांवर सोपविलेली आहे. त्या जबाबदारीच्या अनुषंगाने राज्यपालांना सहाय्य करण्यासाठी राज्यपाल कार्यालयात आदिवासी विकास कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

2. **<u>राज्यपाल सचिव कार्यालयाची रचनाः</u>**

मा. राज्यपालांना सचिवालयीन सहाय करण्याकरिता राज्यपालांच्या सचिवांच्या अधिपत्याखाली प्रशासन शाखा, शिक्षण शाखा, वैधानिक विकास मंडळ शाखा, तसेच आदिवासी विकास कक्ष कार्यरत आहेत. या सर्व शाखांमार्फत संबंधित असलेल्या नस्त्या राज्यपालांच्या सचिवांमार्फत राज्यपालांना सादर केल्या जातात. उक्त शाखांकडे राज्यपाल सचिव कार्यालयातील कामाच्या विषयांची विभागणी <u>परिशिष्ट-1</u> मध्ये दर्शविली आहे.

3. राज्यपालांच्या सचिवालयामार्फत पुरविण्यात येणा-या सेवांचे वेळापत्रक <u>परिशिष्ट-2</u> येथे नमूद करण्यात आले आहे.

4. **गा-हाणी व तक्रारी यांचे निराकरणः**

नागरिकांची काही गा-हाणी असल्यास यासंबंधी परिच्छेद-3 मध्ये नमूद केलेल्या अधिका-यांकडे तक्रार नोंदविता येईल. गा-हाणी समक्ष भेटीत / पत्राने तथा ई-मेलद्वारे मांडता येतील.

5. नागरिकांच्या सनदेचा आढावा दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

6. **जनसामान्यांकडून सूचनाः**

राज्यपालांच्या सचिवालयाच्या अधिपत्याखालील सेवा कार्यभावनेने व कार्यतत्परतने पुरविण्याची हमी देत आहे. या सर्व सेवा पुरविताना नागरिकांना सौजन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचा-यांची राहील.

**परिशिष्ट-1**

| अ.क्र. | विभागाकडून पुरविली जाणारी सेवा | आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर किती कालावधीत सेवा पुरविली जाते. | सेवा पुरविणारा अधिकारी / कर्मचारी (दूरध्वनी क्रमांक) | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल तो अधिकारी व त्यांचा दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| अ) | **प्रशासन शाखाः** | | | |
| 1) | मुदतपूर्व सुटकेसंबंधीचे दयेचे अर्ज | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील प्रकरण क्र.3 च्या कलम 10(1) मधील तरतूदीस अनुसरुन. | श्री. रमेश फ्रान्सिस डिसोझा, अवर सचिव (प्रशासन) दूरध्वनी क्र. 022-2367 36 66 | 1) श्री. रणजीत कुमार, भाप्रसे, राज्यपालांचे उप सचिव (वैविमं) दूरध्वनी क्र.022-23643883<br>2) श्री. बी. वेणुगोपाल रेडडी, भाप्रसे, राज्यपालांचे सचिव दूरध्वनी क्र. 022-23637671 / 23630635<br>फॅक्स क्र. 022-23633272 |
| 2) | भारतीय संविधानातील तरतुदींनुसार राज्यपालांच्या मान्यतेसाठी येणा-या विविध विषयासंबंधीच्या नस्त्या. | | | |
| 3) | विधीमंडळासंबंधीचे कामकाज | | | |
| 4) | विधीयेके व अध्यादेश | | | |
| 5) | राज्यपाल अध्यक्ष असलेल्या महामंडळावरील नियुक्त्या | | | |
| 6) | भारतीय संवधिानातील तरतुदींनुसार करण्यात येणा-या मंत्रीमंडळातील सदस्य, न्यायाधीश यांच्या नियुक्त्या | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 7) | लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या | परंतू ज्या प्रकरणांवर शासनाचा अहवाल किंवा अभिप्राय आवश्यक असेल अशा प्रकरणी शासनाकडून अहवाल प्रलंबित असेल तर निश्चित असा कालावधी विहित करण्यात येण्यासारखा नाही. तथापि, अशा प्रकरणांमध्ये 30 दिवसांतून स्मरणपत्रे पाठवून पाठपुरावा करण्यात येईल.<br><br>अन्य विभागाशी संबंधित असलेले जनतेकडून मा. राज्यपालांच्या नांवे आलेले तक्रार अर्ज 10 दिवसांच्या आत संबंधित विभागांकडे पाठविले जातील | | |
| 8) | लोक आयुक्त उप लोक आयुक्त व मुंबईचे नगरपाल यांच्या नियुक्त्या | | | |
| 9) | महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाचे अध्यक्ष व सदस्यांच्या नियुक्त्या | | | |
| 10) | राज्य मानवी हक्क आयोग, राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयुक्त, राज्य निवडणूक आयुक्त, वित्त आयोग यांचे अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या | | | |
| 11) | संविधानातील तरतुदींनुसार राज्यपालांमार्फत करण्यात येणा-या विधानपरिषद व विधानसभेवर नाम निर्देशन | | | |
| 12) | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) 1979 अंतर्गत राज्यपालांना उद्देशून पाठविलेली अपील व पुनर्विलोकनासंबंधी अर्ज | | | |
| 13) | संविधानातील अनुच्छेद 191 नुसार प्राप्त होणारे आमदारांच्या अनर्हतेबाबतचे अर्ज | | | |
| 14) | फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 च्या कलम 197 नुसार प्राप्त होणारे खटला भरण्यास परवानगी मिळण्यासंबंधीचे अर्ज | | | |
| 15) | रिट अर्ज | | | |
| 16) | जनतेकडून प्राप्त होणा-या तक्रारी | | | |
| 17) | राज्यपाल सचिव कार्यालयातील कर्मचा-यांच्या आस्थापनाविषयक बाबी | | | |
| 18) | राजभवनातील बैठका तसेच कार्यक्रमांचे आयोजन | | | |
| 19) | दूरध्वनी, संगणक इत्यादींचे देखभाल संबंधित कामकाज | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 20) | लेखनसामग्री पुरवठा | | | |
| 21) | महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक, शिस्त व अपील) नियमांतर्गत येणा-या बाबी | | | |
| 22) | विभागीय चौकशी तसेच न्यायालयीन प्रकरणे | | | |
| **ब)** | **<u>शिक्षण शाखाः</u>** | | | |
| 1) | राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरुंच्या नेमणुका | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 10 (1) मधील तरतूदीस अनुसरुन.<br><br>परंतू, ज्या प्रकरणावर शासनाचा तसेच संबंधीत विद्यापीठाचा अहवाल किंवा अभिप्राय आवश्यक असेल अशा प्रकरणी विद्यापीठाकडून व शासनाकडून अहवाल प्रलंबित असेल तर प्रकरणे निकाली काढण्याबाबतचा निश्चित असा कालावधी विहित करण्यात येण्यासारखा नाही. | श्री. प्रताप पां. लुबाळ, राज्यपालांचे अवर सचिव (शिक्षण )<br>दूरध्वनी क्र. 022-2361 78 22 विस्तार क्र. 242 | 1) श्रीमती. उज्ज्वला सं. दांडेकर, राज्यपालांच्या उप सचिव (शिक्षण)<br>दूरध्वनी क्र. 022-2368 38 20<br>श्री. बी. वेणुगोपाल रेडडी, भाप्रसे, राज्यपालांचे सचिव<br>दूरध्वनी क्र. 022-23637671 / 23630635<br><br>फॅक्स क्र. 022-23633272 |
| 2) | प्र-कुलगुरु यांच्या नेमणूका | | | |
| 3) | कुलगुरु यांची रजा, सेवाशर्ती व इतर प्रकरणे तसेच त्यांच्या नियुक्ती संदर्भातील तक्रार अर्ज / प्रकरणे | | | |
| 4) | विद्यापीठांच्या विविध प्राधिकरणांवर निवडून आलेल्या तसेच नामनिर्देशनाद्वारे / (co-option) द्वारे नियुक्त झालेल्या सदस्यांच्या संबंधीचे अपील / तक्रार अर्ज | | | |
| 5) | विद्यापीठांचे कायदे तसेच परिनियम व अध्यादेश यामधील तरतुदींचे अन्वयार्थासंबंधीची (interpretations) प्रकरणे | | | |
| 6) | विद्यापीठातील शिक्षकांच्या नेमणूकीसंबंधीचे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम 102 (6) अंतर्गत आलेले अर्ज | | | |
| 7) | शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचेकडून आलेले तक्रार अर्ज तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संघटनेकडून प्राप्त झालेल्या तक्रारी. | | | |
| 8) | कुलपतींकडे विद्यापीठ कायद्याअंतर्गत विविध कलमांन्वये | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | येणा-या तक्रारी | | | |
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| 9) | **विद्यापीठाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने स्थापन करण्यात येणा-या चौकशी समितीबाबत** | | | |
| 10) | जनतेकडून प्राप्त झालेल्या विद्यापीठाशी / शिक्षण विभागाशी निगडित सर्वसाधारण तक्रारी | तथापी, अशा प्रकरणांमध्ये 30 दिवसांतून स्मरणपत्रे पाठवून शासनाच्या व विद्यापीठांच्या संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल.<br><br>अन्य शासन विभागाशी तसेच विद्यापीठांशी संबंधित असलेले जनतेकडून मा. कुलपतींच्या नांवे आलेले तक्रार अर्ज 10 दिवसांच्या आत संबंधित विभागाकडे पाठविले जातील. | | |
| **क)** | **<u>वैधानिक विकास मंडळे आणि आदिवासी विकास कक्ष</u>**<br><br>राज्यपालांचे निर्देशाबाबत जनतेकडून प्राप्त झालेली निवेदने | महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, 2005 मधील प्रकरण क्र. 3 च्या कलम 10 (1) मधील तरतूदीस अनुसरुन.<br><br>परंतू, ज्या प्रकरणांवर शासनाचा अहवाल किंवा अभिप्राय आवश्यक असेल अशा प्रकरणी शासनाकडून अहवाल | श्री. विकास व. कुलकर्णी,<br>उप संचालक,<br>वैधानिक विकास मंडळ<br>दूरध्वनी क्र.022-23632343 विस्तार क्र. 280 | 1) श्री. रणजीत कुमार, भाप्रसे,राज्यपालांचे उप सचिव ( वैविमं )<br>दूरध्वनी क्र.022-23643883<br>फॅक्स क्र. 022-23633272 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रलंबित | | |
| 1. | 2. | 3. | 4. | 5. |
| | | असेल तर निश्चित असा कालावधी विहित करण्यात येण्यासारखा नाही.<br><br>तथापी, अशा प्रकरणांमध्ये 30 दिवसांतून स्मरणपत्रे पाठवून पाठपुरावा करण्यात येईल.<br><br>मा. राज्यपालांच्या नांवे आलेले तक्रार अर्ज 10 दिवसांच्या आत संबंधित विभागाकडे पाठविले जातील. | | |
| **ड)** | **<u>लेखा</u> शाखा**<br><br>या शाखेचा जनतेशी थेट संपर्क नाही. | | श्री. राजेंद्र धा. राऊत,<br>लेखा अधिकारी<br><br>दूरध्वनी क्र. 022-2363 23 43<br>विस्तार क्र. 213 | श्री. रमेश फ्रान्सिस डिसोझा,<br>अवर सचिव (प्रशासन)<br>दूरध्वनी क्र.<br>022- 2367 36 66 |
| 1) | राज्यपाल सचिव कार्यालय व राज्यपाल परिवार प्रबंधक कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा / आस्थापना विषयक सर्व बाबी हाताळणे | | | |
| 2) | कार्यालयाचे वेतन व भत्ता अदा करणे | मागणी प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांत | | |
| 3) | कर्मचाऱ्यांच्या व्यक्तिगत स्वरुपाच्या आर्थिक मागण्या मंजूर करणे व त्याबाबतची देयके तयार करुन त्यांचे प्रदान संबंधितांना करणे | | | |
| 4) | सेवा / साहित्य पुरवठादार / ठेकेदार यांच्या बिलांचे प्रदान करणे | प्रदान आदेशांसह बिले प्राप्त झाल्यापासून 15 दिवसांत | | |

*****